# MPSC ASO

## Previous Year Paper

### Mains 2019 Paper-I

महाराष्ट्र दुय्यम सेवा, गट-ब (अराजपत्रित) (मुख्य)

परीक्षा -2019

दि. 28 जुलै, 2019

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET No.

109029

प्रश्नपुस्तिका - I

G13

संच क्रमांक **A**

## मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच इतर काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम – 82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

**1.** 'जो झाडे वाढवितो तोच निसर्गाचा खरा उपासक होय.' या विधानाबद्दल माहिती पुढे वाचा : व योग्य विधान कोणते, ते सांगा.

अ. वरील वाक्य हे मिश्र वाक्य आहे.

ब. जो झाडे वाढवितो हे प्रधान वाक्य आहे.

क. तोच निसर्गाचा खरा उपासक होय, हे गौण वाक्य आहे.

ड. जो झाडे वाढवितो या वाक्याला विशेषण वाक्य असेही म्हणता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ व ड बरोबर (2) अ, ब आणि क बरोबर

(3) ब आणि क बरोबर (4) वरीलपैकी सर्व बरोबर

---

**2.** किंकर या शब्दास खालीलपैकी कोणता समानार्थी शब्द आहे ?

(1) मजूर (2) मालक (3) दास (4) शासक

---

**3.** सौजन्य या शब्दाचा विरुद्ध अर्थाचा शब्द कोणता ?

(1) भलेपणा (2) असभ्यता (3) सुजनता (4) शिष्टाचार

---

**4.** पुढील शब्दांपैकी 'रान' या शब्दाचा समान अर्थ नसलेला शब्द सांगा.

(1) वल्लरी (2) वन (3) विपिन (4) कानन

---

**5.** संस्कृतमधून अनेक साधित शब्द मराठीत आले आहेत त्यांना ____________ अशी संज्ञा आहे.

(1) तत्सम (2) अभ्यस्त (3) तद्भव (4) सामासिक

---

**6.** पुढीलपैकी अंशाभ्यस्त शब्द ओळखा.

(1) घरन्घर (2) लाडीगोडी (3) लालेलाल (4) कडकड

---

**7.** 'तूप' हा शब्द कोणत्या भाषेपासून मराठीत आला ?

(1) तेलुगू (2) कन्नड (3) फार्शी (4) अरबी

---

**8.** मराठीमध्ये स्पर्श व्यंजने एकंदर ____________ आहेत.

(1) 24 (2) 25 (3) 26 (4) 23

---

**9.** तर, जरी, म्हणजे, की, तरी या उभयान्वयी अव्ययांचा प्रकार कोणता ?

(1) स्वरूपदर्शक (2) कारणदर्शक (3) उद्देशदर्शक (4) संकेतदर्शक

**10.** 'तुम्हाला एवढे कर्णकर्कश संगीत **ऐकवते** तरी कसे ?' या वाक्यातील ऐकवते या क्रियापदाचा प्रकार ओळखा.

(1) शक्य क्रियापद (2) प्रयोजक क्रियापद

(3) सिद्ध क्रियापद (4) साधित क्रियापद

---

**11.** 'क्', 'च्', 'त्', 'ट्', 'प्' हे परंपरागत व्यंजनध्वनी कोणत्या प्रकारात मोडतात ?

(1) महाप्राण (2) अनुनासिके (3) उष्मे (4) अल्पप्राण

---

**12.** पुढील वाक्प्रचारांची चुकीची जोडी ओळखा.

(1) अर्ध्या वचनात असणे – एखाद्याने सांगितलेले सर्व ऐकणे

(2) अव्वाच्या सव्वा – खुप जास्त वाढवून सांगणे

(3) औट घटकेचे राज्य – दीर्घकाळ टिकणारे वैभव

(4) षष्ठी करणे – झालेल्या चुकांबद्दल रागावणे

---

**13.** 'केसरी' या शब्दाचा अचूक समानार्थी शब्द कोणता ?

योग्य पर्याय निवडा.

अ. पंचानन ब. केशर क. सिंह ड. पंचेन्द्रीय

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ पर्याय अचूक आहे (2) फक्त अ आणि क पर्याय अचूक आहेत

(3) फक्त ब आणि क पर्याय बरोबर आहे (4) फक्त क आणि ड पर्याय अचूक आहेत

---

**14.** 'पात्र' या शब्दाचे विविध अर्थ घेऊन खालील वाक्ये तयार केली आहेत. त्यापैकी पात्र या शब्दाचा योग्य अर्थ असलेली वाक्ये ओळखा.

अ. देवपूजेसाठी हे पात्र काय कामाचे ?

ब. हा बावळट माणूस येथे काय उपयोगाचा ?

क. नदीला पूर आल्याने नदीचा विस्तार मोठा झाला आहे.

ड. त्याला शिक्षक होण्यासाठी डी.एड्. व बी.एड् करणे जरूरीचे आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) पर्याय अ, ब, क व ड हे सर्व चूक आहेत. (2) पर्याय अ व ब बरोबर आहेत. बाकीचे चूक.

(3) पर्याय ब व ड बरोबर आहेत. बाकीचे चूक. (4) पर्याय अ, ब, क व ड बरोबर आहेत.

---

**15.** 'प्रीत्यर्थ' या शब्दाचा संधीविग्रह करा.

(1) प्रिती + अर्थ (2) प्रिति + अर्थ (3) प्रीती + अर्थ (4) यापैकी नाही

**16.** पुढीलपैकी कोणता शब्द तत्सम या गटातील आहे ?

(1) कलश (2) पोथी (3) माणूस (4) ताईत

---

**17.** पुढीलपैकी कोणता/कोणते शब्द जोडाक्षर आहे/आहेत ?

अ. अक्षर

ब. संयुक्त

क. गृहपाठ

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ बरोबर (2) फक्त ब बरोबर

(3) अ आणि ब बरोबर (4) अ, ब, क तिन्ही बरोबर

---

**18.** 'लोक आपली स्तुती करोत किंवा निंदा करोत' या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) मिश्र वाक्य (2) विकल्पबोधक संयुक्त वाक्य

(3) परिणामबोधक संयुक्त वाक्य (4) उद्देशबोधक मिश्र वाक्य

---

**19.** क्रियाविशेषण साधित धातू ओळखा.

(1) खदखदणे (2) रोडावणे (3) लांबणे (4) स्थिरावणे

---

**20.** उभयान्वयी अव्ययाचा उपप्रकार ओळखा.

(1) परिणामवाचक (2) समुच्चयबोधक (3) रीतिवाचक (4) कालवाचक

---

**21.** 'त्याच्या अंगात आले.' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) शक्य कर्मणी (2) समापन कर्मणी (3) अकर्तृक भावे (4) संकीर्ण

---

**22.** पुढीलपैकी कोणते विधान चूक आहे ?

अ. ओझरत्या अन स्पष्ट उच्चारांना अनुनासिक असे म्हणतात.

ब. अक्षरे म्हणजे पूर्ण उच्चाराचे वर्ण.

क. ज्या वर्णाचा उच्चार स्वराच्या साहाय्यावाचून पूर्ण होत नाही त्यांना व्यंजने म्हणतात.

ड. सर्व स्वर व स्वरयुक्त व्यंजने यांना अक्षरे म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ चूक (2) फक्त ब व क चूक

(3) फक्त ड चूक (4) वरीलपैकी कोणतेही बरोबर नाही

**23.** शहाणा – शहाणपणा हे कोणत्या प्रकारचे नाम आहे ?

(1) भाववाचक नाम (2) विशेष नाम

(3) समुदायवाचक नाम (4) सामान्य नाम

**24.** ग्रंथकार, गृहस्थ, द्विज या शब्दांचा समास कोणता ?

(1) उपपदतत्पुरुष (2) षष्ठी तत्पुरुष

(3) चतुर्थी तत्पुरुष (4) व्याधिकरण तत्पुरुष

**25.** 'कोल्हा काकडीला राजी' या म्हणीचा अर्थ

(1) कोल्हयाला काकडी आवडते.

(2) द्राक्षे आंबट असतात म्हणून कोल्हा काकडी खातो.

(3) क्षुद्र माणसे क्षुद्र वस्तूंना भाळतात.

(4) सर्व पर्याय चूक

**26.** पुढीलपैकी व्याकरणदृष्टया शुद्ध शब्द कोणता, ते अचूक सांगा.

(1) मृत्युंजय (2) मृत्युपत्र

(3) मृत्यु (4) वरीलपैकी सर्व बरोबर

**27.** पुढीलपैकी अभ्यास्त शब्द कोणता ?

(1) बहिणभाऊ (2) खरेखोटे (3) आंबटचिंबट (4) पैसाअडका

**28.** 'चतुर्भुज होणे' याचा समानार्थी वाक् प्रचार

(1) हळद लागणे. (2) पदराला गाठ मारणे.

(3) पदरात घालणे. (4) ओटीत देणे.

**29.** फक्त हनुमंतच समुद्र ओलांडून जाऊ शकतो. या वाक्याचा अर्थ बदलू न देता नकारार्थी वाक्यात रूपांतर कसे होईल ?

अ. हनुमंताखेरीज दुसरा कोणताही वानर समुद्र ओलांडून जाऊ शकत नाही.

ब. हनुमंताशिवाय समुद्र ओलांडून जाणारा दुसरा कोणीच नाही.

क. हनुमंताशिवाय समुद्र ओलांडून जाऊ शकणारा नाहीच.

ड. दुसरा कोणीही हनुमंतासारखा समुद्र ओलांडून जाऊ शकत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ब, क व ड सर्व चूक. (2) फक्त क बरोबर आहे. बाकी सर्व चूक.

(3) फक्त ब बरोबर आहे. बाकी सर्व चूक. (4) अ, ब, क व ड हे सर्व बरोबर आहेत.

**खालील उतारा वाचून त्याच्या खाली दिलेल्या प्रश्नांची (प्रश्न क्र. 30 ते 34) उत्तरे अचूक निवडा.**

**संतवाङ्मयातील सामाजिक आशय :**

मराठी संतवाङ्मयाचा विस्तार मोठा असला तरी त्यात विविधता कमी आहे. तत्त्वविवेचनपर स्वतंत्र किंवा टीकात्मक ग्रंथ, ईश्वराच्या लीला वर्णन करणारी आख्याने व प्रदीर्घ कथा, उत्कट भक्तिभावातून स्फुरलेले अभंग, विराण्या, गौळणी, भारुडे, आरत्या, भूपाळया व पदे एवढीच एकंदर संतवाङ्मयाची व्याप्ती आहे. बहुतेक सर्व संतांनी थोडेबहुत अभंग लिहिले आहेत आणि त्यांमधून संतचळवळीच्या खऱ्या प्रातिनिधिक स्वरूपाचा प्रत्यय येतो. सांप्रदायिक वाङ्मय म्हटले की त्यात त्या पंथाने पवित्र मानलेल्या काही ठराविक गोष्टींची वर्णने पुन्हापुन्हा येणे क्रमप्राप्त आहे. वारकरी संतांच्या वाङ्मयातही पांडुरंग व पंढरपूर यांचे श्रेष्ठत्व, नामाचा महिमा, संताची लक्षणे, नीतितत्त्वांचा उपदेश, भक्तिपंथाची सुगमता इत्यादी विषयांना प्राधान्य आहे. अध्यात्म, योगसाधना, वर्णधर्म व चित्तशुद्धी यांसंबंधी त्यांनी आपले विचार आपल्या अभंगांतून मांडलेले आहेत. पण याखेरीज प्रत्येक संताचे असे काही अभंग आहेत की त्यांमधून त्याच्या मनोव्यापारांची कल्पना येते; त्याच्या अस्मितेची ओळख पटते. आपल्या ह्या अभंगांमध्ये त्यांनी पारमार्थिक व लौकिक जीवनातील आपले स्वतःचे अनुभव ग्रथित केले आहेत. समाजाच्या नित्यनैमित्तिक व्यवहारासंबंधीच्या आपल्या प्रतिक्रिया आपापल्या प्रकृतिधर्मानुसार कुणी सौम्यपणे तर कुणी परखडपणाने व्यक्त केल्या आहेत. संतांचे तत्त्वज्ञान, श्रद्धास्थाने व उपासना पद्धती यांत सारखेपणा असला, तरी त्यांच्या आत्मपर वाङ्मयात एकजिनसीपणा नाही. त्यांचे सारे लक्ष परमार्थमार्गावरच केंद्रित झाले होते यात शंका नाही. पण परमार्थसाधनेतही माणसामाणसातील संबंधांचा विचार अटळच नव्हे तर आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. अर्थातच त्यांच्या वाङ्मयात भोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे पडसाद उमटले आहेत.

निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, विसोबा खेचर, जगमित्र नामा, यांच्यासारख्या उच्चवर्णीय संतांनी भेदभाव, वर्णवर्चस्व, कर्मठपणा व पढिकता यांचा निषेध केला आहे. पण त्यांची नापसंती व निषेध तत्त्वविचाराच्या पातळीवर आहेत. त्यांच्या निरूपणाचा प्रवाह शांत व संथ आहे. त्यात खोल सहानुभूती असली तरी मनक्षोभ नाही. त्यांचे आवाहन श्रोत्यांच्या सद्भावनेला व सात्त्विकतेला आहे. नामदेवप्रभृती बहुजनसमाजातील संतांच्या अभंगात भावनोदेकाचा अंश अधिक आहे. त्यांच्या वाङ्मयात आपल्याला त्यांच्या सुप्त आकांक्षांची चाहूल लागते. बौद्धिक कुचंबणेमुळे होणारी मनाची तगमग त्यांच्या आत्मनिवेदनातून आपणांस जाणवते. सामाजिक विषमतेचे शल्य त्यांच्या मनात सलत राहते. धर्ममार्तंडांच्या खोट्या प्रतिष्ठेपायी होणारा अपमान ते सहजासहजी विसरू शकत नाहीत. तसे पाहिले तर हे संत व्यक्तिगत रागलोभांच्या पलीकडे गेले होते. पण सामाजिक अपप्रवृत्तींबद्दलची खंत त्यांच्या उद्गारांतून व्यक्त होतेच होते. चोखामेळ्यासारखे संत तर समाजाच्या अगदी खालच्या थरात, अस्पृश्य जातीत जन्मलेले. अठराविश्वे दारिद्र्य आणि सामाजिक गुलामगिरी ही त्यांची पिढ्यानपिढ्यांची मिरास. त्यांना उच्चारस्वातंत्र्य ते कितीसे असणार ? परंपरागत रूढींचा जाच निमूटपणे सहन करण्याखेरीज त्यांना गत्यंतर नव्हते. जितके दडपण जास्त तितका कोंडमारा अधिक. पण आपले मनोगत मोकळेपणाने बोलून दाखविण्याचीही त्यांना मुभा नव्हती. नामदेवांच्या कृपेने त्यांना नवी वाट गवसली होती. नव्या जाणिवांनी त्यांचे मन भारलेले होते. मात्र त्या दिशेने जरा कुठे हालचाल केली की सनातन्यांचा रोष ठेवलेलाच. म्हणून आपल्या अंतरीच्या व्यथा निवेदन करताना ते पराकाष्ठेची लीनता का स्वीकारतात, अजीजीच्या सुरात श्रोत्यांना का आळवतात ते सहज लक्षात येते.

---

**30.** वरील संताचे सारे लक्ष कशावर केंद्रित झाले होते ?

अ. अध्यात्म   ब. योगसाधना   क. परमार्थ   ड. वर्णधर्म

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब बरोबर   (2) फक्त क बरोबर

(3) फक्त ड बरोबर   (4) फक्त अ बरोबर

**31.** नामदेव प्रभृती संतांच्या अभंगात कशाचा अंश अधिक आहे ?

(1) भावनोद्रेकाचा

(2) बौद्धिक कुचंबणेचा

(3) कर्मठपणाचा

(4) पढिकतेचा

---

**32.** संत हे कशाच्या पलीकडे गेले होते ?

(1) नापसंती
(2) रागलोभ
(3) निषेध
(4) सामाजिक अपप्रवृत्ती

---

**33.** नामदेवांच्या कृपेने कुणाला नवी वाट गवसली होती ?

(1) विसोबा खेचर
(2) जगमित्र नामा
(3) चोखामेळा
(4) ज्ञानेश्वर

---

**34.** चोखामेळा पराकाष्ठेची लीनता का स्वीकारतात ?

अ. सनातन्यांच्या रोषांमुळे

ब. सामाजिक गुलामगिरीमुळे

क. अठराविश्वे दारिद्र्यामुळे

ड. अस्पृश्य जातीत जन्मल्यामुळे

**पर्यायी उत्तरे :**

(1) ब, क आणि ड बरोबर

(2) फक्त ड बरोबर

(3) फक्त ब बरोबर

(4) फक्त अ आणि क बरोबर

35. गणपतीची मिरवणूक आमच्या घरावरुन पुढे गेली. या वाक्यातील ध्वन्यार्थ कोणता ?

(1) वाच्यार्थ (2) लक्ष्यार्थ

(3) व्यंग्यार्थ (4) कोणताही ध्वन्यार्थ नाही

36. रामा जलद वाचतो व रामा फार उतावळा आहे. ही वाक्ये कोणत्या अव्ययाची उदाहरणे आहेत ?

(1) क्रियाविशेषण अव्यय (2) शब्दयोगी अव्यय

(3) उभयान्वयी अव्यय (4) केवलप्रयोगी अव्यय

37. समासाचा विग्रह करताना ज्या ज्या विभक्ती प्रत्ययांचा संबंध येतो, त्यावरून तत्पुरुष समासाचे प्रकार पडतात. खालील चतुर्थी तत्पुरुष समासाच्या प्रकाराचे उदाहरण अचूक सांगा.

(1) वादग्रस्त – वादाने ग्रस्त (2) स्वर्गप्राप्त – स्वर्गाला प्राप्त

(3) डोईजड – डोईला जड (4) भक्तिवश – भक्तिने वश

38. 'गळयाशी येणे' या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ असलेला पर्याय ओळखा.

(1) भाड भीड घालणे (2) लचांड मागे लागणे

(3) अंगलट येणे (4) नावडती वस्तू अथवा काम मिळणे

39. पुढीलपैकी न्यूनत्वबोधक वाक्य कोणते, ते ओळखा.

(1) तुम्ही स्वतः या किंवा गडयाला पाठवा.

(2) रामा, गोविंदा व विष्णू मुंबईला गेले.

(3) यंदा पुष्कळ पाऊस पडला, परंतु तो अवेळी पडल्याने पिकास फायदा झाला नाही.

(4) घोडा हा चपळ व उमदा प्राणी आहे.

40. निर्मला तिच्या नोकरी करणाऱ्या सुनेचा सगळा त्रास सहन करते. कारण –
योग्य म्हणीचा वापर करा.

(1) दोन्ही घरचा पाहुणा उपाशी. (2) दुभत्या गाईच्या लाथा गोड.

(3) पळसाला पाने तीनच. (4) भुकेला कोंडा निजेला धोंडा.

41. 'घर फिरले की घराचे वासेही फिरतात.' या म्हणीच्या विरुद्धार्थी म्हण

(1) घराची ओज आंगण सांगते.

(2) घरोघरी मातीच्या चुली.

(3) घरासारखा पाहुणा होतो पण पाहुण्यासारखे घर होत नाही.

(4) यापैकी एकही पर्याय बरोबर नाही.

**42.** पुढे काही समानार्थी शब्दांचे गट दिलेले आहेत. त्यापैकी चुकीचा गट कोणता, ते सांगा.

(1) हिरण्यगर्भ, सहस्रांशु, वासरमणी
(2) दिनमणि, दिवाकर, दिनराज
(3) रवि, भानू, अर्क, तपन
(4) दिनकर, सुधाकर, दिगंबर

---

**43.** खाली दिलेल्या विधानातून चुकीचे विधान ओळखा व त्याचा अचूक पर्याय लिहा.

अ. जे शब्द संस्कृतच्या मूळ रूपात बदल न होता मराठीत आले आहेत, ते शब्द तद्भव होत. उदाः हात

ब. तत् + सम = तत्सम म्हणजे संस्कृतमधील मूळ रूपात काहीही फरक न पडता जसेच्या तसे येतात, त्यास तत्सम शब्द म्हणतात.

क. 'चाक' या संस्कृत शब्दापासून 'चक्र' हा मराठी शब्द आलेला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) अ आणि क
(4) अ, ब आणि क तिन्ही विधाने चुकीची आहेत

---

**44.** योग्य जोड्या जुळवा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| क. | पाणी पडणे | i. | खूप चोप देणे |
| ख. | पाणी पाजणे | ii. | वाया जाणे |
| ग. | पाणी सोडणे | iii. | दोषाला जागा असणे |
| घ. | पाणी मुरणे | iv. | त्याग करणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | क | ख | ग | घ |
|---|---|---|---|---|
| (1) | i | ii | iii | iv |
| (2) | ii | i | iv | iii |
| (3) | i | iii | ii | iv |
| (4) | iv | iii | ii | i |

---

**45.** नाचणारा, वाकलेला व जळता हे शब्द वाक्यात विशेषण म्हणून वापरल्यास ते कोणत्या प्रकारचे विशेषण होईल ?

(1) क्रियाविशेषण
(2) धातुसाधित विशेषण
(3) क्रियाविशेषण अव्यय
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**46.** पुढील ओवीतील अलंकार ओळखा.

गगन राज्य अफाट तथा रवी
उगरूनी नुपती बहुतोषवी
म्हणून पक्षीच भाट सुखावले
करिती गायन ही स्तुती भासले

(1) स्वरूपोत्प्रेक्षा (2) हेतूत्प्रेक्षा (3) फलोत्प्रेक्षा (4) मालोत्प्रेक्षा

---

**47.** पुढील पर्यायात जोड्या दिलेल्या आहेत, त्यापैकी चुकीची जोडी नसलेला पर्याय कोणता ?

(1) दंगामस्ती, थट्टामस्करी – फार्शी + मराठी

(2) बाजारहाट, अंमलबजावणी – मराठी + फार्शी

(3) अक्कलहुशारी, डावपेच – (फार्शी + फार्शी)

(4) वरीलपैकी सर्वच बरोबर

---

**48.** खाली दिलेल्या दोन शब्दांच्या एकत्रीकरणातून तयार होणारा जोडशब्द ओळखा.

वधू + आगमन = ?

(1) वधूगमन (2) वधूआगमन

(3) वध्वागमन (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

**49.** पुढील विधान वाचा :

'मी प्रेम करीत राहिन' या रीतिभूतकाळी वाक्याचे अपूर्ण भविष्यकाळी रूप असलेला पर्याय निवडा.

(1) मी प्रेम करीन (2) मी प्रेम करीत असेन

(3) मी प्रेम केले असेन (4) मी प्रेम करीत असे

---

**50.** पुढील वाक्ये वाचा :

अ. आंधळ्याला आरश्याचा काय उपयोग ?

ब. लबाडाचं आमंत्रण जेवल्यावर खरं.

या दोन्ही वाक्यातील नामाचा प्रकार कोणता ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) विशेषणसाधीत नाम (2) नामसाधाधीत विशेषण

(3) अव्ययसाधीत नाम (4) क्रियावाचक नाम

**51.** Identify the sentence(s) punctuated **correctly**.

(1) Many people, unfortunately are poor.

(2) Come, with me friend.

(3) He is a non-vegetarian; she is a vegetarian.

(4) We have, of course, to learn by experience.

---

**52.** Point out the **correct** indirect narration of the following sentence :

My mother said to Malati, "Why are you nervous today ?"

(1) My mother asked Malati whether she was nervous yesterday.

(2) My mother asked Malati why was she nervous that day.

(3) My mother asked Malati why she was nervous that day.

(4) My mother asked Malati if she was nervous yesterday.

---

**53.** None of us knew the way.

The **correct** tag-question for the sentence above is __________ .

(1) did we ? (2) did us ?

(3) didn't we ? (4) didn't us ?

---

**54.** Choose the **correct** sentences with regard to use of adverbs.

a. She dropped here the bag.

b. He plays very well tennis.

c. Did you see my bag anywhere ?

d. I rarely go to movies.

**Answer options :**

(1) Only a and d (2) Only c and d

(3) Only b and c (4) Only a, b and c

---

**55.** Choose the **correct** replacement of the given sentence :

Here is a pool which we can swim in !

(1) Here is a pool for swim in !

(2) Here is a pool to swimming !

(3) Here is a pool to swim in !

(4) Here is a pool swimming in !

---

**56.** Point out the **incorrect** sentence.

(1) Each bush and each tree has the right to grow in the ground.

(2) Neither Ram nor Shyam have sympathy for the poor parents.

(3) Shanti and Sumati go hand in hand.

(4) Either Soni or Rani has broken these bangles.

---

**57.** As soon as the doctor opened the heart for surgery, he found the tricuspid valve out of order.

Which of the following transformations is **correct** ?

(1) Scarcely the doctor opened the heart for surgery then he found the tricuspid valve out of order.

(2) No sooner did the doctor open the heart for surgery than he found the tricuspid valve out of order.

(3) No sooner did the doctor opened the heart for surgery then he found the tricuspid valve out of order.

(4) No sooner does the doctor open the heart for surgery than he found the tricuspid valve out of order.

---

**58.** Choose the complex sentence(s).

a. The tired climbers advanced slowly.

b. They moved with great effort.

c. I telephoned my home in England as soon as I arrived in New York.

**Answer options :**

(1) Only c (2) Only b and c (3) Only a and b (4) a, b and c

---

**59.** Which bank serves the public best ?

Select the **correct** passive voice of the sentence.

a. By which bank the public is served best ?

b. By which bank is the public served best ?

c. Which is the bank that served the public best ?

**Answer options :**

(1) Only a

(2) Only b

(3) Only c

(4) All of the above

---

**60.** We have lived in this house since 1952.

The use of perfect tense in the above sentence is called ________ .

(1) the resultative use

(2) the perfect of experience

(3) the continuative use

(4) the inclusive use

---

**61.** Identify the underlined clause.

You have not been through what I have been through.

(1) Adjectival Clause (2) Adverbial Clause

(3) Noun Clause (4) Adverbial Phrase

---

**62.** Which of the following are ***not*** meanings of the word in capitals ?

I was absolutely FLABBERGASTED when she told me the price.

a. Filled with shock

b. Filled with appreciation

c. Filled with wonder

**Answer options :**

(1) Only a (2) Only b (3) Only a and c (4) a, b and c

---

**63.** a. One has to work hard to be a successful person.

b. Vasant seldom comes to see his aged parents.

c. I sometimes feel that I have done nothing important in my life.

d. One has to walk fast in the treadmill-test.

The underlined words in the above sentences are ________ .

**Answer options :**

(1) Prepositions (2) Conjunctions

(3) Adjectives (4) Adverbs

---

**64.** State the meaning of the following phrase. Choose the **correct** option from those given below :

'Blow one's own trumpet'

(1) Praise oneself (2) To play on the trumpet

(3) Having to do with music (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**65.** Select the **most appropriate** meaning of the underlined phrase in the following sentence :

Nearly all institutions are going to the dogs nowadays.

(1) doing good (2) fast changing

(3) developing (4) deteriorating

---

**66.** Choose the **most appropriate** phrase for the underlined word.

He is in difficulty and needs help.

(1) in a huff (2) in a jiffy (3) in a jam (4) on a roll

---

**67.** He won the election very easily.

Which of the following idiomatic expressions is suitable for the underlined words in the above sentence ?

(1) hands up (2) hand in hand

(3) by the hand (4) hands down

---

**68.** Select the closest meaning of the underlined phrase in the following sentence :

People, at large, have the habit of burying their heads in the sand.

(1) doing nothing (2) ignoring unpleasant harsh realities

(3) living happily (4) passing time leisurely

---

**69.** Choose the best substitution for the given phrase :

A very clear or typical example of something.

(1) Paradigm (2) Hypothetical

(3) Parallel (4) Paramount

---

**70.** Point out the sentence that has the **incorrect** spelling.

a. Hippocrasy is a well-known personality trait of the politicians.

b. While changing your name, you will have to publish it in the gazet.

c. Not all catelogs are correct in any educational institute.

d. He always says that he is the captan of his soul.

**Answer options :**

(1) Only a and b

(2) Only c and d

(3) All of the above

(4) None of the above

71. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Hold out | I. | To express one's opinions at length |
| b. | Hold to | II. | Believable |
| c. | Hold water | III. | Remain loyal to |
| d. | Hold forth | IV. | To offer |

**Answer options :**

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | III | I | II |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | III | IV | II | I |
| (4) | I | IV | III | II |

**Read the passage given below carefully and answer Q. Nos. 72 to 76 based on it.**

Concerning Louis the Fourteenth himself, the world seems at last to have formed a correct judgment. He was not a great general; he was not a great statesman; but he was, in one sense of the word, a great king. Never was there so consummate a master of what our James the First would have called king-craft — of all those arts which most advantageously display the merits of a prince and most completely hide his defects. Though his internal administration was bad — though the military triumphs which gave splendour to the early parts of his reign were not achieved by himself — though his later years were crowded with defeats and humiliations — though he was so ignorant that he scarcely understood the Latin of his mass book — though he fell under the control of a cunning Jesuit and of a more cunning woman — he succeeded in passing off on his people as being above humanity. And this is the more extraordinary because he did not seclude himself from public gaze like those oriental despots, whose faces were never seen, and whose very name it is a crime to pronounce lightly. It has been said that no man is a hero to his valet : and all the world saw as much of Louis the Fourteenth, as his valet would see. Five hundred people assembled to see him shave and put on his breeches in the morning. He then kneeled down at the side of his bed, and said his prayers while the whole assembly awaited the end in solemn silence. He walked about his gardens with a train of two hundred courtiers at his heels. All Versailles came to see him dine and sup. He was put to bed at night in the midst of a crowd as great as that which had met to see him rise in the morning. Yet, though he constantly exposed himself to the public gaze in situations in which it is scarcely possible for any man to preserve much personal dignity, he to the last impressed those who surrounded him with the deepest awe and reverence.

72. Which of the following is/are ***true*** about Louis the Fourteenth ?

a. He was a great statesman.

b. He did not seclude himself from public.

c. He was a great king.

**Answer options :**

(1) Only a (2) Only a and b (3) Only b and c (4) a, b and c

---

73. No man is a hero to his valet. The underlined word in the above sentence means __________ .

(1) Friend

(2) Servant who cleans clothes

(3) Personal male servant of rich man

(4) Helper

---

74. King Louis the Fourteenth is considered as a perfect master of king-craft because __________ .

a. he could hide all his weaknesses

b. he pretended to be a great ruler

c. he was a great statesman

**Answer options :**

(1) Only a and c (2) Only b and c (3) Only c (4) Only a and b

---

75. Which statements are ***true*** according to the passage ?

a. Eastern rulers kept themselves away from the public.

b. It was a crime to utter the Eastern rulers' names with disrespect.

c. Louis the Fourteenth was a learned person.

d. Louis the Fourteenth was a crafty person.

**Answer options :**

(1) Only a and c (2) Only b and d (3) Only a and b (4) Only c and d

---

76. Louis the Fourteenth passing off on his people as being above humanity is extraordinary because __________ __________ .

a. he hid from his subjects

b. he made a show of his daily routine

c. he impressed his people greatly even if he exposed himself to the public

d. he could not maintain his dignity

**Answer options :**

(1) Only a and c (2) Only b and c (3) Only c and d (4) Only a and d

---

**77.** Indira Gandhi was one of the greatest women in India.

Choose the **correct** alternative that transforms the above sentence into positive degree.

(1) No other woman in India was as great as Indira Gandhi.

(2) Very few women in India were as great as Indira Gandhi.

(3) Indira Gandhi was as great as any other women in India.

(4) Indira Gandhi was greater than all other women in India.

---

**78.** This proposal is objected to by us.

Which one of the following is the **correct** active structure corresponding to the above sentence ?

(1) We object these proposal.

(2) This proposal is objected.

(3) We object to this proposal.

(4) This proposal is subject to objection.

---

**79.** Choose the **correct** alternative for the underlined words in the following sentences :

a. I had a brief look at the report.

b. It was my brief to make sure that the facts were set down accurately.

c. I was briefed about the incident.

d. Introduction was brief and polite.

**Answer options :**

(1) short, instruction, informed, succinct

(2) scanty, hasty, directed, concise

(3) little, pointed, directive, lengthy

(4) compact, advise, updated, instruct

---

**80.** He ________ not wear a neck-tie if he doesn't want to.

To indicate absence of compulsion, the blank should best be filled by

(1) may

(2) should

(3) dare

(4) need

---

81. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 नुसार _______ हे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीच्या शिफारशी नुसार राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्ताची नियुक्ती करतील.

(1) राष्ट्रपती (2) पंतप्रधान
(3) राज्यपाल (4) राज्याचे कायदा मंत्री

The Chief Commissioner for Right to Service under the Maharashtra Right to Public Services Act, 2015 shall be appointed by the _______ on recommendation of committee chaired by the Chief Minister.

(1) The President (2) The Prime Minister
(3) The Governor (4) The Law Minister of State

---

82. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या कलम 5(2) च्या अन्वये ज्या व्यक्तीचा अर्ज फेटाळल्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांका पासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत _______ कडे कलम 9(1) अन्वये अपील दाखल करू शकते.

(1) जिल्हाधिकारी (2) प्रथम अपील प्राधिकारी
(3) अपील आयोग (4) उच्च न्यायालय

As per Section 9(1) of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 any eligible person whose application is rejected under Section 5(2) may file an appeal before the _______ within the period of thirty days from the date of receipt of rejection of the application.

(1) District Collector (2) First Appellate Authority
(3) The Appeal Commission (4) The High Court

---

83. खालीलपैकी कोणत्या संस्थेने/संस्थांनी माहिती अधिकार अधिनियम, 2005 नुसार माहिती देणे बंधनकारक ***नाही*** ?

(1) बॉर्डर रोड डेव्हलपमेंट बोर्ड (2) ऐव्हीएशन रिसर्च सेंटर
(3) दोन्ही (1) व (2) (4) वरीलपैकी काहीही नाही

Which of the following institution(s) is/are ***not*** bound to furnish information under the Right to Information Act, 2005 ?

(1) Border Road Development Board (2) Aviation Research Centre
(3) Both (1) and (2) (4) None of the above

---

84. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत, केंद्रीय माहिती आयुक्तांची संख्या ही _______.

(1) कमीत कमी 5 असेल (2) 10 पेक्षा जास्त नसेल
(3) मर्यादा नाही (4) वरीलपैकी काहीही नाही

As per Right to Information Act, the number of Central Information Commissioners are _______.

(1) Minimum 5 (2) Not exceeding 10
(3) No limit (4) None of the above

---

85. केंद्रीय मुख्य माहिती आयुक्तांची नियुक्ती _______ हे करतात.

(1) माहिती निबंधक (2) पंतप्रधान
(3) राष्ट्रपती (4) राज्यपाल

Central Chief Information Commissioner is appointed by _______.

(1) Registrar of Information (2) Prime Minister
(3) President (4) Governor

**86.** महाराष्ट्र शासनाच्या 'इ-प्रशासन' धोरणानुसार मान्य असलेल्या 'सी एल डी आर' [CLDR] ह्या आंतरराष्ट्रीय मानकाचे पूर्ण रूप काय ?

(1) कॉमन लोकल डेटा रीपॉझीटरी

(2) सेंट्रली लॉक्ड डेटा रीसोर्स

(3) वरीलपैकी सर्व

(4) वरीलपैकी नाही

What is the full form of 'CLDR' international standard used in 'e-governance' policy of Maharashtra ?

(1) Common Local Data Repository

(2) Centrally Locked Data Resource

(3) All of the above

(4) None of the above

---

**87.** HTML हे खालीलपैकी कोणत्या पर्यायाचे संक्षिप्त रूप आहे ?

(1) हायपर टेक्स्ट मार्कअप लँग्वेज

(2) हायपर टेक्स्ट मेकअप लँग्वेज

(3) हायपर टेक्स्ट मॅन्युपुलेशन लँग्वेज

(4) हायपर टेक्स्ट मॉडीफाइड लँग्वेज

HTML is the abbreviation of which of the following options ?

(1) Hyper Text Markup Language

(2) Hyper Text Makeup Language

(3) Hyper Text Manipulation Language

(4) Hyper Text Modified Language

---

**88.** डॉस व विंडोज ऑपरेटींग सिस्टीम मध्ये ________ वाईल्ड कार्ड, कोणत्याही अक्षरे संयोजनासाठी वापरतात ?

(1) ? (2) *

(3) # (4) &

In DOS and Windows Operating System, ________ wild card stands for any combinations of letters.

(1) ? (2) *

(3) # (4) &

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**89.** योग्य जोड्या जुळवा :

| | *ऑपरेटींग सिस्टीम* | | *ॲप्लीकेशन (उपयोगिता)* |
|---|---|---|---|
| अ. | सिम्बियन | I. | आय बी एम पीसी साठी प्रथम ऑपरेटींग सिस्टिम |
| ब. | पाम | II. | एम्बेडेड डिव्हाइसेस ज्यांना रिअल टाईम ऑपरेटींग सिस्टीम लागते त्यासाठी डिझाईन केलेली. |
| क. | विंडोज सीई.नेट | III. | हाताने धरलेल्या उपकरणांसाठी उदा. पीडीए |
| ड. | डॉस | IV. | स्मार्ट सेल फोन्स मध्ये वापरतात |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | III | II | I |
| (2) | II | I | IV | III |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | II | III | I |

Match the following :

| | *Operating System* | | *Application* |
|---|---|---|---|
| a. | Symbian | I. | First operating system of IBM PC |
| b. | Palm | II. | Designed for embedded devices requires real time operating system |
| c. | Windows CE.NET | III. | For hand held devices like PDA's |
| d. | DOS | IV. | Used in smart cell phones |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | III | II | I |
| (2) | II | I | IV | III |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | II | III | I |

---

**90.** www तयार करणारा शास्त्रज्ञ कोणता ?

(1) टीम बर्नस ली (2) जेम्स गोस्लींग

(3) लिनस तोरवाल्ड्स (4) ॲन्ड्रयू टेननबम

The scientist who developed the idea of www is __________ .

(1) Tim Berners-Lee (2) James Gosling

(3) Linus Torvalds (4) Andrew Tanenbaum

**91.** 'कद्स' हे ________ साठीचे अरबी भाषेतील नाव आहे.
(1) बैरूट (2) हैफा (3) जेरूसलेम (4) पॅलेस्टाईन
'Quds' is the Arabic name for ________.
(1) Beirut (2) Haifa (3) Jerusalem (4) Palestine

**92.** ब्लॅक होल ची पहिली प्रतिमा टिपण्यासाठी खगोल शास्त्रज्ञांनी वापरलेल्या दुर्बिणीचे नांव काय ?
(1) इव्हेंट हॉरीझोन टेलिस्कोप (2) फर्मि गॅमा-रे स्पेस टेलिस्कोप
(3) हार्ड एक्स-रे मॉड्यूलेशन टेलिस्कोप (4) लूनार-बेस्ड अल्ट्रा व्हॉयलेट टेलिस्कोप
Name the telescope which is used by astronomers to capture the first image of Black Hole.
(1) Event Horizon Telescope (2) Fermi Gamma-ray Space Telescope
(3) Hard X-ray Modulation Telescope (4) Lunar-based Ultra Violet Telescope

**93.** 2019 च्या लोकसभा निवडणुकांमध्ये खालीलपैकी कोणत्या मतदारसंघामध्ये निवडणुक पुढे ढकलण्यात आली ?
(1) कडलोर (2) चिदंबरम
(3) धर्मपुरी (4) वेल्लोर
In which of the following constituency, elections were postponed during 2019 Lok Sabha elections ?
(1) Cuddalore (2) Chidambaram
(3) Dharmapuri (4) Vellore

**94.** पंतप्रधान मोदी सरकारने नवीन मंत्रालयाची स्थापना केली आहे. ह्या मंत्रालयाचे नाव ________ आहे.
(1) संसाधन शक्ति (2) जल शक्ति
(3) स्त्री शक्ति (4) नैसर्गिक शक्ति
PM Modi's government has formed a new ministry. The name of the ministry is ________.
(1) Sansadhan Shakti (Resources) (2) Jal Shakti (Water)
(3) Stree Shakti (Women) (4) Naisargik Shakti (Natural)

**95.** मतदारांमध्ये मतदान प्रक्रियेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी उभारण्यात आलेल्या भारताचे पहिल्या 'वोटर पार्क' चे उद्घाटन कोठे झाले ?
(1) पुणे, महाराष्ट्र (2) मुंबई, महाराष्ट्र
(3) फरीदाबाद, हरियाणा (4) गुरुग्राम, हरियाणा
Where was India's first 'Voter Park' inaugurated to create awareness about the electoral process among the voters ?
(1) Pune, Maharashtra (2) Mumbai, Maharashtra
(3) Faridabad, Haryana (4) Gurugram, Haryana

**96.** 'सम्प्रीती - 2019' हा संयुक्त सैनिकी अभ्यास खालीलपैकी कोणत्या दोन देशां दरम्यान होता ?
(1) भारत आणि बांग्लादेश (2) भारत आणि यू.एस.
(3) भारत आणि इराण (4) भारत आणि ब्राझील
'Sampriti – 2019' was a joint military exercise between which of the following two countries ?
(1) India and Bangladesh (2) India and US
(3) India and Iran (4) India and Brazil

97. 'युरोनेक्स्ट' म्हणजे काय आहे ?

(1) शेअर बाजार
(2) फिल्म निर्माती कंपनी
(3) सॉफ्टवेअर कंपनी
(4) उपग्रहांशी संबंधीत कंपनी

What is 'Euronext' ?

(1) A stock exchange
(2) A film producing company
(3) A software company
(4) A company dealing with satellites

98. सोशल मीडिया द्वारे ज्या स्त्रियांनी समाजावर प्रभाव टाकला आहे. त्यांच्या असामान्य यशाची दखल घेऊन प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने ________ सुरू केले आहे.

(1) वेब-वंडर वुमेन कॅम्पेन
(2) वंडर-वेब वुमेन कॅम्पेन
(3) वंडर-वुमेन वेब कॅम्पेन
(4) वुमेन वेब-वंडर कॅम्पेन

Government has launched ________ to note and celebrate the exceptional achievements of those women who have impacted society through social media.

(1) web-wonder women campaign
(2) wonder-web women campaign
(3) wonder-women web campaign
(4) women web-wonder campaign

99. टेलिकम्युनिकेशन्स विभागा (DOT) कडून कोणत्या दूरसंचार कंपनीला इन-फ्लाईट कनेक्टिव्हीटी परवाना मंजूर झाला आहे ?

(1) वोडाफोन आयडीया लिमिटेड
(2) रिलायन्स कम्युनिकेशन्स
(3) भारत संचार निगम लिमिटेड
(4) भारती एअरटेल लिमिटेड

Which Telecom Company was granted In-flight Connectivity License by the Department of Telecommunications (DOT) ?

(1) Vodafone Idea Limited
(2) Reliance Communications
(3) Bharat Sanchar Nigam Limited
(4) Bharati Airtel Limited

100. भारतीय सैन्याने 'मैत्री' नावाचा सर्वात लांब सस्पेंशन पूल कोणत्या नदीवर बांधला ?

(1) ब्रह्मपूत्र
(2) यमुना
(3) सिंधु
(4) गोदावरी

Over which river did the Indian Army construct the longest suspension bridge named 'Maitri' ?

(1) Brahmaputra
(2) Yamuna
(3) Indus
(4) Godavari

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे ....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम – 82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वतःबरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र.क. 201.** ''अंगावर काटा उभा रहाणे'' या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरून येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) अतिशय भिती वाटणे'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र.क. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**